





पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

# हिंदुस्थान

अमृत ७५ महोत्सव १९५०-२०२४








■ वर्ष ७५ वे/अंक २११ वा ■ ■ अमरावती, शुक्रवार, दिनांक २१ मार्च २०२५ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ www.dainikhindusthan.com marathe_vinod1@rediffmail.com ■ भारतीय सौर ६ चैत्र १९४७ ■ ■ पृष्ठे १२ ₹ ४.०० ■







# छत्तीसगडमध्ये 30 नक्षलवाद्यांचा खात्मा



विजापूर दि. २० : नक्षलींचा गड असलेल्या छत्तीसगडमधील बीजापूर आणि दंतेवाडात सुरक्षा दलाने मोठे ऑपरेशन सुरु केले आहे. सुरक्षा दलांनी नक्षलींची कंबर तोडली आहे. दोन वेगवेगळ्या ऑपरेशनमध्ये ३० नक्षली ठार झाले आहेत. या कारवाईत एक जवान शहीद झाला आहे. सुरक्षा दलास घटनास्थळावरुन मोठ्या प्रमाणावर शस्त्रास्त्रे आणि दारुगोळा मिळाला आहे.

४० ते ४५ नक्षलवाद्यांना जवानांनी घेरले होते. गुरुवारी सकाळी सुरक्षा दलाने नक्षलीविरोधात मोठे मोहीम सुरु केली. सुरक्षा दलाच्या टीमने विजापूर आणि दंतेवाडाच्या गंगालूर भागात ऑपरेशन सुरु केले. यावेळी नक्षली आणि सुरक्षा दलात चकमक सुरु झाली. दोन ऑपरेशनमध्ये ३० नक्षली ठार झाले आहे. सुरक्षा दलाने विजापूरमध्ये १८ तर कांकेरमध्ये ४ नक्षलींना ठार केले. या चकमकीत एक जवान शहीद झाला.

सुरक्षा दल नक्षलवादी कमांडर हिडमाच्या शोधात व्यस्त आहेत. हिडमाचा शोध घेण्यासाठी १२५ हून अधिक गावांचे तांत्रिक मॅपिंग केले जात आहे. सुरक्षा दल छत्तीसगड, ओडिशा आणि आंध्र प्रदेशच्या सीमेवर असलेल्या सुमारे १२५ गावांचे थर्मल इमेजिंग करत आहे. सुरक्षा दलांनी तीन महिन्यांत आतापर्यंत ७७ नक्षलवाद्यांचा खात्मा केला आहे.

**महिन्याभरात दुसऱ्यांदा मोठे ऑपरेशन**

गुरुवारी सकाळी सात *(पान २ वर)*

# ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर



मुंबई दि. २० : जगभरात भारताची मान अभिमानानं उंचावणारा गुजरातमधील 'स्टॅच्यु ऑफ युनिटी' अर्थात सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा घडवणारे ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना यंदाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत यासंदर्भातली घोषणा केली आहे. २५ लाख रुपये, मानचिन्ह, मानपत्र व शाल असं या पुरस्काराचं स्वरूप असून या माध्यमातून राम सुतार यांच्या कामाचा गौरव केला जाणार आहे. कोकणात उभारल्या जाणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचं कामदेखील राम सुतार यांनाच देण्यात आलं आहे.

महाराष्ट्र भूषण पुरस्कार हा राज्याचा सर्वोच्च नागरी पुरस्कार महाराष्ट्र सरकारकडून दरवर्षी देण्यात येतो. या पुरस्काराचं स्वरूप २५ लाख रुपये, मानपत्र, मानचिन्ह व शाल असं आहे. १२ मार्च २०२५ रोजी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निवड समितीच्या बैठकीत महाराष्ट्र भूषण २०२२४ या पुरस्कारासाठी ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांच्या नावाला मान्यता देण्यात आली आहे. राम सुतार यांचं वय १०० वर्षं आहे. अजूनही ते शिल्प तयार करत आहेत. चैत्यभूमी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्माराकासाठीची मूर्तीही राम सुतार हेच घडवत आहेत, अशी माहिती देवेंद्र फडणवीसांनी विधानसभेत दिली. *(पान २ वर)*

# विदर्भात अमरावतीसह ५ जिल्ह्यांना आजपासून पावसाचे अलर्ट

नागपूर दि. २० : सध्या बंगालच्या उपसागरात चक्रकार वाऱ्यांची स्थिती सक्रिय असल्याने मध्यप्रदेश छत्तीसगड सह विदर्भातही पावसाचा अलर्ट आहे .गेल्या आठवड्यात उष्णतेच्या तीव्र लाटेला विदर्भातील नागरिकांना सामोरे जावं लागलं .मात्र आज पासून पुढील दोन ते तीन दिवस विदर्भासह मराठवाड्यात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे .हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार आज (२० मार्च) बुलढाणा अकोला वाशिम अमरावती नागपूर या जिल्ह्यांसह मराठवाड्यातील हिंगोली परभणी आणि नांदेड जिल्ह्याला येलो अलर्ट देण्यात आला आहे .तसेच उत्तर महाराष्ट्र तसेच मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे . उद्या विदर्भातील पाच जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आलाय .

दरम्यान मराठवाडा वगळता कोकण मध्य महाराष्ट्र सामान्य तापमानाची नोंद झाली .मराठवाड्यात ३८ते ४० अंश सेल्सिअस एवढे तापमान होते . आज बीडमध्ये ४०.८ अंश सेल्सिअस तापमान होते . तर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ३८ अंश सेल्सिअसची नोंद झाली .परभणी ३९.९ लातूर ३८.३ धाराशिव ३९ अंश सेल्सिअस तापमान होते . विदर्भात अकोला अमरावती *(उर्वरित पान २ वर)*

# दिशा सालियान मृत्यूप्रकरणात आदित्य ठाकरेंवर आरोप

मुंबई दि. २० : सुमारे पाच वर्षांपूर्वी झालेल्या दिशा सालियान या तरुणीच्या मृत्युप्रकरणी तिच्या वडिलांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेत युवासेनाप्रमुख आणि राज्या सरकारमधील माजी मंत्री आदित्य ठाकरे यांच्यावर गंभीर आरोप केल्याने राज्यातील राजकारण ढवळून निघालं आहे. या मुद्य्यावरून आज विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दोन्ही सभागृहांमध्ये गदारोळ झाला. एकीकडे या प्रकरणाच्या चौकशीवरून सत्ताधारी पक्षाच्या आमदारांकडून आग्रही मागणी होत असतानाच दुसरीकडे ठाकरे गटानेही आपल्या युवानेत्यावर होत असलेल्या आरोपांविरोधात आक्रमक पवित्रा घेतला आहे. आदित्य ठाकरे



यांनी समोर येत या आरोपांबाबत कोर्टात उत्तर देऊ अशी स्पष्ट भूमिका घेतली आहे. त्यानंतर आता आदित्य ठाकरे यांचे वडील आणि शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचीही प्रतिक्रिया समोर आली आहे.

दिशा सालियान मृत्यूप्रकरणी आदित्य ठाकरेंवर झालेल्या आरोपांबाबत प्रतिक्रिया देताना उद्धव ठाकरे म्हणाले की, आमचं घराणं, आमच्या घराण्याचा सहा सात पिढ्या ह्या जनतेसमोर आहेत. त्यामुळे या विषयात काही तथ्य नाही आहे. दूर दूर तक कोई संबंध नही, म्हणतात त्याप्रमाणे या प्रकरणाशी दुरान्वयानेही संबध नाही आहे, असे उद्धव ठाकरे यांनी स्पष्टपणे सांगितले.

यावेळी उद्धव ठाकरे यांनी दिशा सालियान प्रकरणावरून बेछूट आरोप करत असलेल्या विरोधकांनाही इशारा दिला. राजकारण जर या वाईट बाजूने न्यायचं *(पान २ वर)*

# केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी पेन्शन योजनेची नवीन अधिसूचना जारी

नवी दिल्ली दि. २० : केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी मोठी बातमी आहे. पेन्शन फंड रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट अथॉरिटीने गुरुवारी युनिफाइड पेन्शन स्कीम लागू करणारी अधिसूचना जारी केली आहे. या योजनेअंतर्गत, निवृत्तीपूर्वीच्या १२ महिन्यांत मिळालेल्या सरासरी मूळ पगाराच्या ५० टक्के रक्कम निश्चित पेन्शन म्हणून देण्याची तरतूद आहे.

ही अधिसूचना राष्ट्रीय पेन्शन प्रणाली अंतर्गत येणाऱ्या केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांसाठी सरकारने २४ जानेवारी २०२५ रोजी जारी केलेल्या युपीएस अधिसूचनेचे अनुसरण करते.

पीएफआरडीएने निवेदन जारी केले आहे . या निवेदनात म्हटले आहे की, यूपीएसशी संबंधित नियम १ एप्रिल २०२५ पासून लागू होतील. या नियमांमुळे १ एप्रिल २०२५ रोजी सेवेत असलेल्या विद्यमान केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांसह केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना आणि १ एप्रिल २०२५ रोजी किंवा त्यानंतर केंद्र सरकारी सेवेत भरती झालेल्या कर्मचाऱ्यांना एनपीएसमध्ये नोंदणी करता येते. केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या या सर्व श्रेणींसाठी नोंदणी आणि दाव्याचे फॉर्म १ एप्रिल २०२५ पासून प्रोटीन सीआरए वेबसाइटवर *(उर्वरित पान २ वर)*

## विधानपरिषदेतही भाजपच सर्वात मोठा पक्ष

मुंबई दि. २० : पाच जागांसाठी जाहीर झालेली विधान परिषदेची पोटनिवडणूक बिनविरोध झाली आहे. पाच जागांसाठी आलेल्या सहा अर्जांपैकी पाच अर्ज वैध ठरले होते. या पाच जणांनी आज (२० मार्च) अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशीपर्यंत अर्ज कायम ठेवले. त्यामुळे ही निवडणूक बिनविरोध झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी घोषित केले.

**राज्याला मिळाले नवीन ५ आमदार**

निवडणूक प्रक्रिया संपताच राज्याला नवीन ५ आमदार मिळाले आहेत. भाजपचे दादाराव केचे, संजय केनेकर, संदीप जोशी, राष्ट्रवादीचे संजय खोडके आणि *(पान २ वर)*

# '....तर तुमच्यावरही हे पलटू शकतं' दिशा सालियन प्रकरणावर उद्धव ठाकरेंचे मोठे भाष्य



मुंबई दि. २० : दिवंगत अभिनेता सुशांतसिंह राजपूतची मॅनेजर दिशा सालियनचे मृत्यूप्रकरण पुन्हा एकदा राज्याच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी आला आहे. दिशा सालियनच्या वडिलांनी न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत दिशाच्या मृत्यूप्रकरणात आमदार आदित्य ठाकरे यांचा संबंध असल्याचा संशय व्यक्त केला आहे. त्यानंतर सत्ताधाऱ्यांनी आदित्य ठाकरेंवर लवकरात लवकर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. याच मागणीनंतर महाराष्ट्रातील राजकीय वातावरण तापलं आहे. असे असतानाच या प्रकरणावर माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी या प्रकरणावर प्रतिक्रिया दिली आहे. खोटेनाटे आरोप करत असाल तर भाविष्यात *(पान २ वर)*

## बीडमध्ये आणखी एका गुन्हेगारी टोळीवर मकोका

बीड दि. २० : जिल्ह्यातील गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलीस प्रयत्नशील असल्याचे दिसून येत आहे. कारण, संतोष देशमुख हत्याप्रकरणाला १०० दिवस पूर्ण झाले असून याप्रकरणासह विविध घटनांमध्ये पोलीस तातडीने *(पान २ वर)*

# आमची परिस्थिती सुधारली की आम्ही लाडक्या बहिणींना २१०० देऊ : अजित पवार

मुंबई दि. २० : लाडकी बहिण योजना ही महायुती सरकारची महत्वकांक्षी योजना आहे. विधानसभा निवडणुकीच्या आधी या योजनेची घोषणा करण्यात आली होती. या योजनेच्या माध्यमातून पात्र महिलांना १५०० रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. मात्र, विधानसभा निवडणुकीवेळी महिलांना २१०० रुपये देण्याचे आश्वासनं महायुतीनं दिले होते. ते २१०० रुपये कधी मिळणार? असा सवाल उपस्थित केला जात आहे. याबाबत आज राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मोठं वक्तव्य केलं आहे.



लाडकी बहिण योजनेबाबत राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. लाडक्या बहिणीला २१०० रुपये देण्यासाठी आम्ही नाही म्हटलं नाही. पण राज्याची आर्थिक परिस्थिती *(उर्वरित पान २ वर)*

## माहोल....




**राजकारण, धर्म वगैरे अश्या गोष्टी असेल तर सांग बाकी बरोजगारी, गरीबी यांसारख्या फालतू प्रश्नांसाठी माझ्याकडे वेळ नाही..**

# विधान परिषद सभापती, विधानसभा अध्यक्षांविरोधात विरोधक राज्यपालांच्या दारी

मुंबई दि. २० : राज्याचं अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असून यात सत्ताधारी आणि विरोधक सातत्याने आमनेसामने येत असल्याचं दिसून आले. त्यातच विरोधकांनी विधान परिषदेचे सभापती आणि विधानसभेचे अध्यक्ष यांच्या कामकाजाच्या भूमिकेवर आक्षेप घेत थेट राज्यपालांना पत्र लिहिले आहे. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी राज्यपाल सी.पी राधाकृष्णन यांच्याकडे पत्र लिहून सभापती राम शिंदे, अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या कार्यशैलीवर नाराजी व्यक्त केली आहे.

राज्यपालांना लिहिलेल्या पत्रात अंबादास दानवे यांनी म्हटलं की, संसदीय प्रणालीमध्ये विरोधी पक्ष हा एक महत्त्वाचा घटक आहे. त्यांची भूमिका सरकार विरोधी नसून सरकारच्या निर्णयावर आणि धोरणांवर अंकुश ठेवणारी आहे. आवश्यक तिथे टीका आणि पर्यायी धोरण सूचविणे आहे. मात्र महाराष्ट्र विधान परिषद आणि विधानसभा सभागृहामध्ये *(पान २ वर)*

# नागपूर हिंसाचाराचा मेसेज बांगलादेशातून आला : किरीट सोमय्या

छत्रपती संभाजीनगर दि २० : नागपुरात झालेल्या हिंसाचाराचा सूत्रधार फईम खान आहे. याच फईम खानचं मालेगाव, बांगलादेशचे देखील कनेक्शन आहे. नागपूरमध्ये जो हिंसाचार झाला त्यासाठी जो सोशल मीडियावर मेसेज आला, तो मेसेज बांगलादेश येथून आला होता, असा खळबळजनक दावा भाजपच्या ज्येष्ठ नेते किरीट सोमय्या यांनी केला आहे. किरीट सोमय्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना ते जिल्हाधिकारी कार्यालयात बोलत होते.



गेला काही दिवसांपासून देशात औरंगजेबाच्या कबरीवरून राजकारण तापलं आहे. महायुतीच्या घटक पक्षातील नेते रोज खळबळजनक विधान करत आहेत. तसंच बजरंग दल आणि विश्व हिंदू परिषदेच्या वतीने करण्यात आलेल्या आंदोलनानंतर नागपूरमध्ये हिंसाचार उसळला. यामध्ये अनेक नागरिकांच्या वाहनांचं, घरांचं नुकसान झालं. *(पान २ वर)*

# राज्यातील सरकारी शाळांना सीबीएसई पॅटर्न लागू



मुंबई दि.२० : राज्यातील राज्य शिक्षण मंडळांच्या शाळांना सीबीएसई अभ्यासक्रम लागू करण्यासंदर्भात सूचना देण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे यंदाच्या शैक्षणिक वर्षापासूनच स्टेट बोर्ड शाळेतील विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात सीबीएससी पॅटर्न लागू करण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ या वर्षापासून सीबीएससी पॅटर्न लागू होणार असून राज्यातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढील लागावी या हेतूने सरकारने हा निर्णय घेतला आहे. राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी यासंदर्भात आज सभागृहात माहिती *(पान २ वर)*

## तापमान

| | | |
|---|---|---|
| अमरावती | - | ३८.२ |
| अकोला | - | ४०.० |
| बुलढाणा | - | ३६.६ |
| ब्रह्मपुरी | - | ३९.६ |
| चंद्रपूर | - | ३९.० |
| गडचिरोली | - | ३७.४ |
| गोंदिया | - | ३६.४ |
| नागपूर | - | ३८.६ |
| वर्धा | - | ४०.० |
| वाशिम | - | ४०.४ |
| यवतमाळ | - | ३९.२ |
| भंडारा | - | ३७.० |






















■ www.dainikhindusthan.com ■ फोन : २६६०४२९/२६६६४६४ ■ फॅक्स ०७२१-२६६३३६० ■ ई-मेल : dainikhindusthanpress@gmail.com ■ आर.एन.आय.क्र. ११४२०/५७ ■ पोस्टल रजि.नं. ए.एमटी./आर.एन.पी./८५/२०१८-२०२० ■ अमरावती ● यवतमाळ ● अकोला ● बुलढाणा ● वाशिम